गोपनीय

अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका
जावक क्र. : अतिमआ(ज)/गोप/१३
दिनांक : १५/०९/२००८

मा. महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस सविनय सादर ..

विषय : शिक्षण मंडळ- गणवेष व शालोपयोगी साहित्य निविदा गैरव्यवहार - श्री. सुरज मांढरे, उप आयुक्त (भूमी आणि जिंदगी) यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाबाबत.

शिक्षण मंडळाकडील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गणवेष, बूट व अन्य शालेय साहित्य निविदा काढून खरेदी प्रकरणी अनुचित प्रकार झाले असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यासंदर्भात मा. आयुक्त यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार श्री. सुरज मांढरे, उप आयुक्त (भूमी आणि जिंदगी) यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमून चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. दरम्यानच्या काळात या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.अतिमआ(ज)/गोप/११ दि. १३/८/२००८ अन्वये पुढील आदेश होईपर्यंत १) गणवेष बूट खरेदीकरीता पुरवठादारास वर्कऑर्डर देवू नये, २) वर्कऑर्डर दिली असल्यास पुरवठादाराकडून माल स्विकारू नये आणि ३) ठेकेदाराकडून उपरोक्त माल स्विकारले असल्यास बिलाप्रित्यर्थ कोणत्याही प्रकारे रकमा आदा करू नयेत असे शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ यांना आदेश दिले होते.

चौकशी अधिकारी श्री. मांढरे यांनी श्री. राजेश नहार, श्री. अजय शिंदे, राम बोरकर यांनी केलेल्या माहिती अधिकारात विचारलेल्या प्रश्नांचे अनुषंगाने आणि सदर निविदांमध्ये सहभागी झालेल्या १) सनराज प्रिंट पॅक इंडस्ट्रीज,चाकण २) समर्थ को-ऑप कन्झूमर स्टोअर्स, ठाणे ३) महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम कॉर्पोरेशन,मुंबई ४) राष्ट्रीय मजदूर सहकारी संघ(मर्या.) मुंबई, (५) जील एंटरप्राईजेस, मुंबई यांनी केलेल्या तक्रारीनुसार उपरोक्त सर्व वस्तूंच्या निविदांची छाननी करून व समक्ष चौकशी करून अहवाल सादर केला होता. सदर अहवालात अतिशय गंभीर बाबी आहेत. तथापी नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने

श्री. सुधाकर तांबे, शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ यांना त्याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक असल्याने सदर अहवालावर मुद्देनिहाय खुलासा दि. १२/९/२००८ पर्यंत सादर करण्याबाबत या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.मआ/अतिमआ(ज)/गोप/१२ दि. १/९/२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. शिक्षण प्रमुख श्री. सुधाकर तांबे यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.शिमं/४७८८ दि. ११/९/२००८ अन्वये त्यांचा खुलासा सादर केला आहे.

चौकशी अधिकारी श्री. सुरज मांढरे यांचा चौकशी अहवाल आणि त्या अहवालावर शिक्षण प्रमुख यांनी उपरोक्त पत्रान्वये सादर केलेला मुद्देनिहाय खुलासा यांचे अवलोकन होण्यास विनंती आहे. उपरोक्त चौकशी अहवाल व शिक्षण प्रमुख यांच्या खुलाशावर मुद्देनिहाय शिफारस सोबत सादर केली आहे.

शिक्षण प्रमुख यांचे दि. ११/९/२००८ च्या पत्रात त्यांनी तांत्रिक चुका झाल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांनी वादग्रस्त निविदादारांना दिलेल्या वर्कऑर्डर रद्द केल्याबाबतचे पत्रेही पाठविलेली आहेत. मात्र आमचेकडील दि.१३/८/२००८ चे पत्रानंतर वास्तविक त्यांनी मालाचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविणे अपेक्षित नव्हते. कारण या संपूर्ण निविदा प्रक्रियेबद्दलच वाद होता. शिक्षण प्रमुख यांनी शिक्षण मंडळाने केलेली कार्यवाही बिनचूक व बरोबर असल्याचे उपरोक्त दि. ११/९/२००८ च्या पत्रात जे नमूद केलेले आहे त्याच्याशी आम्ही सहमत नाही. आमच्या मते निविदा प्रक्रिया राबवितांना निविदा जाहीरात प्रसिद्ध करण्यापासून ते निविदांबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत आदर्श निविदा कार्यपद्धतीचा अवलंब केला नसल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ गणवेषाची निविदा काढतांना विद्यार्थी संख्या, त्यांना लागणाऱ्या गणवेषाचे माप, गणवेषांचे डिझाईन याचा विचार केलेला नाही. शिक्षण मंडळाकडे विद्यार्थी संख्येचा आकडा उपलब्ध आहे. त्यावरून खरेदी करावयाच्या अंदाजे नगांचा उल्लेख निविदा जाहीरातीत करता आला असता. मोठया संख्येने खरेदी केल्यास कमी दरामध्ये माल उपलब्ध होतो हे साधे तत्वही शिक्षण प्रमुख यांनी विचारात घेतले नाही. निविदा पात्र-अपात्र करण्याचे निकषही निश्चित केल्याचे दिसत नाही.

उपरोक्त मालाच्या खरेदीकरीता निविदा जाहीरात प्रथम दि.३०/५/०८ रोजी दैनिक लोकमत, प्रभात या दोन वृत्तपत्रात देण्यात आली होती. त्यानंतर दि. ४/६/२००८ रोजी शुद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात येवून त्यात विद्यार्थी गणवेष पुरविणाऱ्या आणखी काही कंपन्यांची नांवे समाविष्ट केली. तसेच सुदर्शन

कंपनीबरोबरच नवनीत, क्लासमेट, प्रतिभा या कंपन्यांचा समावेश केला. वास्तविक गणवेष, शालेय साहित्य खरेदी हा प्रकार शिक्षण मंडळाला नविन नाही. त्यामुळे दिनांक दि. ३०/५/२००८ ची जाहिरात प्रसिद्ध करतांनाच उपरोक्त कंपन्यांचाही समावेश केला असता तर त्याची माहिती त्याच वेळी सर्व संबंधितांना झाली असती व आणखी निविदा प्राप्त होवून स्पर्धा झाली असती.

तसेच निविदा कालावधी विचारपूर्वक निश्चित केल्याचे दिसत नाही. दि. ३०/५/२००८ च्या जाहिरातीत निविदा फॉर्म विक्री दि. ३०/५/२००८ ते ७/६/२००८ अशी देण्यात येवून निविदा भरण्याची मुदत दि. ९/६/२००८ ते १३/६/२००८ अशी देण्यात आली होती. नंतर दि. ४/६/२००८ रोजी प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रकात फक्त निविदा फॉर्म विक्रीची मुदत वाढविलेली आहे. निविदा सादर करण्याच्या कालावधीत वाढ केली नाही यामुळे इच्छूक पुरवठाधारकांना निविदा सादर करण्यास पुरेसा अवधी मिळालेला नाही. परिणामी थोड्याच पुरवठाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

वह्या पुरविण्यासंदर्भात पुढील वस्तुस्थिती निदर्शनास येते. सुदर्शन कंपनीने खाली नमूद केलेल्या चार पुरवठादारांना सुदर्शन कंपनीच्या वह्या पुरविण्याकरीता अधिकारपत्रे दिली आहेत. पुरवठादाराची नांवे आणि त्यांना दिलेल्या पत्राचा दिनांक त्यांच्या नावापुढे नमूद केला आहे.

| | |
|---|---|
| १) मे. गणेश ट्रेडर्स, पुणे | दि. ४/२/२००८ |
| २) मे. कल्याणी कॉर्पोरेशन, पुणे | दि. २४/२/२००८ |
| ३) मे. पद्मयोग, पुणे | दि. ५/४/२००८ |
| ४) मे.चिराग एजन्सी, पुणे | दि. १८/५/२००८ |

उपरोक्त चारही पत्रे शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका यांना उद्देशून दिलेली आहेत. पहिली निविदा जाहीरात दि. ३०/५/२००८ रोजी प्रसिद्ध झाली आहे. उपरोक्त चारही पत्रांच्या तारखा उपरोक्त निविदा जाहीरात प्रसिद्ध होण्याच्या पूर्वीच्या आहेत. निविदा जाहीरात जर दि.३०/५/२००८ ची आहे तर त्या निविदांकरीता सादर करावयाची अधिकारपत्रे त्यापूर्वीच्या तारखेंची कशी याबाबत शिक्षण प्रमुख समाधानकारक खुलासा करू शकलेले नाहीत. निविदा प्राप्त झाल्यानंतर निविदांची छाननी करण्यासाठी शिक्षण मंडळाकडील कोणत्याही अधिकारी कर्मचाऱ्याने निविदांचा अभ्यास करून जबाबदारीने निवेदन ठेवल्याचे दिसून येत नाही. किंबहुना निविदा प्रकरणे ज्या पद्धतीने हाताळली

गेली आहेत ते पाहता शिक्षण मंडळाकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना निविदा प्रक्रियेची काहीच माहिती नाही की काय असा प्रश्न निर्माण होतो.

गणवेष खरेदी प्रकरणामध्ये राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती सहकारी संघ मर्यादित, मुंबई यांनी खालील तपशिलाप्रमाणे दोन डिमांड ड्राफ्ट सादर केले आहेत.

| अ.क्र. | डिमांड ड्राफ्ट क्रमांक | दिनांक | बँकेचे नांव | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १) | ३५२१६० | १२/६/२००८ | द मुंबई डिस्ट्रीक्ट सेंट्रल को ऑप. बँक लि. | ४,००,०००/- |
| २) | ३५२१६१ | १२/६/२००८ | - " - | २२,०००/- |

उपरोक्त दोन्ही डिमांड ड्राफ्ट खातेदाराच्या खात्यात रक्कम शिल्लक नसल्याच्या कारणास्तव परत आल्याबाबत निवेदन ठेवलेले आहे. रक्कम बँकेत जमा केल्यानंतरच बँक डिमांड ड्राफ्ट देते. अशा परिस्थितीत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे रक्कम जमा नसल्याच्या कारणास्तव डिमांड ड्राफ्ट परत कसे येवू शकतात याबाबत संबंधितांना विचारणा न करता खात्याने फक्त ठेकेदाराची निविदा अपात्र ठरविण्याची कार्यवाही केलेली आहे.

गणवेष खरेदीमध्ये अ पाकीट उघडल्यानंतर एकूण ५ पुरवठादार पात्र ठरले होते. त्या सर्वांचे कापडांचे नमुने सुपरिंटेंडेंट कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यापैकी फक्त जील एंटरप्राईजेस, मुंबई यांचे नमुन्याचे कापड शिक्षण मंडळाच्या स्पेसिफिकेशन प्रमाणे बरोबर असल्याचा अहवाल उपरोक्त शासन मान्य प्रयोगशाळेने दिलेला आहे. मात्र निविदेमध्ये स्पर्धा झालेली आहे असा खोटा आभास निर्माण करण्यासाठी कापडाचा नमुना नापास झालेल्या निविदादारांपैकी तुषार ड्रेसेस ॲण्ड टेलरींग फर्म यांच्याही निविदेचा विचार करून त्यांना काम देण्याचा ठराव पारीत केला आहे. वास्तविक जील एंटरप्राईजेस आणि तुषार ड्रेसेस ॲण्ड टेलरींग फर्म यांचे दरात अगदी किरकोळ म्हणजे दीड-दोन रूपयांचा फरक आहे हे पाहता किरकोळ फरकासाठी नापास केलेल्या पुरवठादाराकडून म्हणजे तुषार ड्रेसेस ॲण्ड टेलरींग फर्म यांचेकडून गणवेष खरेदी करण्यास मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त विद्यार्थ्यांव्यतिरिक्त विद्यानिकेतनकडील विद्यार्थ्यांसाठीही वर नमूद केल्याप्रमाणेच कार्यवाही करून नमुना नापास झालेल्या तुषार ड्रेसेस ॲण्ड टेलरींग फर्म, पुणे यांचेकडून खरेदी करण्यास

मान्यता दिलेली आहे.   ज्यांच्या कापडाचा नमुना प्रयोगशाळेने पास केला त्या जील एंटरप्राईजेस यांचा निविदा दर व तुषार ड्रेसेस ॲण्ड टेलरींग फर्म यांचा निविदा दर यामध्ये प्रती नगामागे असलेला केवळ ४ ते ५ रूपयांचा फरक आहे. मात्र येथेही स्पर्धा झाली असे दाखविण्यासाठी कापडाचा नमुना नापास झालेल्या तुषार ड्रेसेस ॲण्ड टेलरींग फर्म यांच्या निविदेचा विचार करून निविदा मान्य केली आहे.

एकंदरीत पाहता ही संपूर्ण टेंडर प्रक्रिया अत्यंत सदोष असून यामध्ये प्रशासकीय जबाबदारी व संस्थेचे हित जपण्यासाठी घ्यावयाची दक्षता शिक्षण मंडळाच्या प्रशासनाकडून दाखविले गेलेले नाही हे स्पष्ट होत आहे.  याबाबत मुद्देनिहाय अहवाल देखील सोबत जोडलेला आहे.  यासर्व बाबींचा विचार करता या संदर्भात खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात येत आहेत.

(१) ही निविदा प्रक्रिया पूर्णत: सदोष असल्याने ती रद्द करणेसंदर्भात शिक्षण मंडळाने त्वरित निर्णय घेणे योग्य होईल.

(२) ही निविदा प्रक्रिया सदोष असल्याचे कारणास्तव रद्द करणे आवश्यक असल्याने नविन निविदा प्रक्रिया सुरू करावयाची झाल्यास त्यासाठी लागणारा कालावधी, एकूण कापड घेवून ते शिवण्यासाठीच्या साधनसामुग्रीची उपलब्धता व त्यासाठी लागणारा वेळ यासर्व बाबी विचारात घेता यावर्षी विद्यार्थ्यांना गणवेष मिळणे शक्य होणार नाही असे सकृतदर्शनी वाटते.  त्यामुळे फक्त या वर्षाकरीता सर्व विद्यार्थ्यांना गणवेषासाठी व अन्य शैक्षणिक साहित्यासाठी उदा. बूट-मोजे, पेटीकोट इत्यादि टेंडर प्रक्रियेद्वारे वितरीत करावयाच्या प्रस्तावित केलेल्या वस्तूंप्रित्यर्थ आर्थिक स्वरूपात थेट सहाय्य देणे योग्य होईल असे आमचे मत आहे.  त्यामध्ये देखील रकमेचा गैरउपयोग होवू नये यासाठी प्रथमत: पहिला हप्ता म्हणून केवळ ६०% रक्कम धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट द्वारे देण्यात यावा व प्रत्यक्ष उपरोक्त साहित्य बाजारभावाने खरेदी केल्याची खात्री करून व त्याबाबत खरेदीचे बिल तपासल्यानंतर उर्वरित ४०% रक्कम धनादेशाने/डिमांड ड्राफ्टने संबंधित विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत अदा करण्यात यावी असे आमची शिफारस आहे.

(३) या वर्षाच्या वह्यांचे व पाट्यांचे वाटप यापूर्वीच झालेले असल्यामुळे त्यांच्या दराबद्दल संभ्रम निर्माण झालेला असल्यामुळे यासंदर्भात पुढील प्रमाणे कार्यवाही करणे योग्य होईल असे आम्हांस वाटते.

निविदेतील सर्व स्पेसिफिकेशनच्या वह्या व पाट्या बाजारात होलसेल दराने ज्या किंमतीला मिळतात तितकीच रक्कम उपरोक्त दोन्ही वस्तूंच्या पुरवठादारास अदा करण्यात यावी. यापेक्षा अधिक रक्कम संबंधितांना प्रदान करणे योग्य होणार नाही. यासंदर्भात शिक्षण मंडळाच्या ठरावात दुरूस्ती करणे, बाजारात माहिती घेणे, इत्यादि संदर्भात तांत्रिक बाबींची पुर्तता शिक्षण मंडळाने करावी व अंतिम निर्णय घेण्यापूर्वी तसा अहवाल पुणे महानगरपालिकेकडे सादर करावा.

(४) या टेंडर प्रक्रियेमध्ये पुरेसे प्रशासकीय जबाबदारी व संस्थेचे हित रक्षणाची दक्षता शिक्षण प्रमुख म्हणून श्री. सुधाकर तांबे यांनी घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी त्यांचे शासकीय कर्तव्यात कसूर केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यासाठी त्यांची खातेनिहाय चौकशी सुरू करावी असे प्रस्तावित करण्यात येते.

(५) या टेंडर प्रक्रियेमध्ये शिक्षण मंडळाचा देखील सक्रिय सहभाग असून शिक्षण मंडळाने घेतलेले निर्णय हे संस्थेच्या हिताचे आहेत असे वरील वस्तुस्थिती विचारात घेता दिसून येत नाही. शिक्षण मंडळाला याबाबतीत विचारणा करणे किंवा त्यांचेवर अन्य कारवाई प्रस्तावित करणे याबाबतचे अधिकार मा. मुख्य सभेला असल्याने सदरची बाब पुढील निर्णयासाठी मा. मुख्य सभेच्या निदर्शनास आणावी असे आमचे मत आहे.

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)**
**पुणे महानगरपालिका**